# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :२/एनजीसी/२००४/ ४३८
दिनांक :

16 सितम्बर SEP 2004

प्रति,
प्राचार्य,
ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीचे
ओरिएंटल कॉलेज ऑफ फार्मसी,
सेक्टर २,प्लॉट नं.३,४,५,सानपाडा रेल्वेस्टेशन जवळ,
नवी मुंबई- ४०० ७०५.

विषय- शैक्षणिक वर्ष २००४-०५ साठी विना अनुदान तत्वावर नवीन
औषधनिर्माणशास्त्र पदवी संस्था सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत

संदर्भ:- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक: टिईएम-२००४/
(२३५/०४) तांशि-१. दिनांक १ जून २००४

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून विना अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रु.५०/-च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून औषधनिर्माणशास्त्र पदवी संस्था सन २००४-२००५ पासुन विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे:

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.

Principal
Oriental College of Pharmacy
400 705

PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF PHARMACY

२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१० दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यांत यावे. शिक्षकवृंद व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

४. संस्थेने औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून रु.८.०० लाख बँक ऑफ महाराष्ट्र ओशिवरा शाखा,मुंबई येथे पावती क्रं. ०५९३१७१, दि.१७/६/२००४ अन्वये संस्थेचे सचिव व संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच द्वितीय वर्षासाठी पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी रु.७.०० लाख संयुक्त खात्यात जमा करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम आरक्षण शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाचे शुल्क शिक्षण शुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके,नियतकालिके इ. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व कुलसचिव, मुंबई विद्यापीठ,मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. या संचालनालयाने किंवा मुंबई विद्यापीठ,मुंबई यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ,मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०.संस्थेला कुलसचिव, मुंबई विद्यापीठ,मुंबई यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

११.सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शै.व.२००४-०५ साठी प्रवेशनियमात विहित केलेल्या तरतुदीनुसार केंद्रिभूत प्रवेशप्रक्रियेद्वारे करण्यांत येतील.

PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF PHARMACY

ORIENTAL COLLEGE OF PHARMACY

१२.विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१३.सदर अभ्यासक्रमासाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील व सदर अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता मिळाली नाही तर सदर अभ्यासक्रम तात्काळ बंद करावा लागेल अन्यथा होणाऱ्या परिणामास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

१४.शासनाने, या संचालनालयाने व कुलसचिव, मुंबई विद्यापीठ,मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.

( प्रा. न. बा. पासलकर )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई.

प्रत:

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
३. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ,मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. कार्यासन क्रमांक १० मुख्य कार्यालय,मुंबई.
५. श्री.एन. बी.पाटील,सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.

ORIENTAL COLLEGE OF PHARMACY

Principal
PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF PHARMACY
400 705